# भारतीय लोकशाही समोरील नक्षलवादाचे आव्हान

श्रीमती उषादेवी अंकुश कांबळे राज्यशास्त्र विभाग डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगली

---

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारली ज्यामध्ये लोकांकडून लोकांसाठी राज्य चालवणे अपेक्षित आहे. जगातील सर्वात मोठे लोकशाही राज्य अशी भारताची ओळख असली तरी या लोकशाहीचा आधार हा स्वातंत्र, समता, बंधुता हा आहे. परंतु या लोकशाहीपुढील मोठ्ठे आव्हान हे नक्षलवादाचे आहे. हा प्रश्न फक्त हिंसात्मक चळवळीचा नसून सामाजिक, आर्थिक, आणि राजकीय असंतोषामुळे निर्माण झाला आहे. अनेक कारणामुळे कित्येक तरुण गेल्या काही दशकापासून या नक्षलवादी चळवळीत ओढले गेले आहेत.

नक्षलवादाची समस्या जाणून घेण्यासाठी नक्षलवाद म्हणजे काय त्याचा उगम त्याची कारणे इत्यादी गोष्टी समजून घेणे महत्त्वाचे ठरते. समाजात राहताना त्या ठिकाणची चालीरीती, संस्कृती, भौगोलिक वातावरण, सामाजिक वातावरण हे महत्त्वाचे असते. या सभोवतालच्या परिस्थितीवर मानवाचा, त्याच्या कुटुंबाचा विकास अवलंबून असतो. तसेच या सर्व गोष्टीमुळे तेथील भागाचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकास अवलंबून असतो.

**लोकशाही-**

राज्याचे अनेक प्रकार आहेत. त्यापैकी महत्त्वाचा एक प्रकार म्हणजे लोकशाही. या राज्य प्रकारात राज्य शासन हे जनतेकडून प्रत्यक्षपणे आणि अप्रत्यक्षपणे निवडलेल्या प्रतिनिधींकडून चालवले जाते. या शासन प्रकारात जनतेच्या विकासासाठी कल्याणकारी राज्य निर्माण केले जाते.

नक्षलवाद समजून घेण्यासाठी सर्वप्रथम साम्यवाद, माओवाद समजणे महत्त्वाचे आहे. साम्यवाद माओवाद हा मार्क्सवादाचा एक भाग आहे. कार्ल मार्क्सचे विचार हे सामाजिक वर्ग संघर्षावर आधारीत आहेत. मार्क्स ने सर्वप्रथम साम्यवादाचा विचार मांडला. यानुसार आज पर्यंत 'आहे रे' वर्ग आणि 'नाही रे' वर्ग यांच्यात संघर्ष चालू आहे. समाजात ज्या लोकांकडे संपत्ती भांडवल याचा मोठा हिस्सा आहे तो 'आहे रे' वर्ग आणि जे लोक गरीब आहेत, ज्यांनी फक्त कामगार म्हणून कामे केली आहेत तो वर्ग 'नाही रे' असा संबोधला जातो.

मार्क्सचे क्रांतीचे विचार आणि नवमार्क्सवादीचे विचार:-

'कम्युनिस्ट मॅनीफेस्टो' या ग्रंथात मार्क्स आणि एंगल्सने वर्ग संघर्षाचा इतिहास मांडलेला आहे. त्यांच्या मते समाजात 'आहे रे' वर्गाचे वर्चस्व आहे. जर समाजात समानता आणावयाची आहे असेल म्हणजेच साम्य हवे असेल तर कामगार वर्गाने क्रांती करणे अपरिहार्य आहे. क्रांती शिवाय समाजात साम्यवादी येणे शक्य नाही असा त्यांचा विश्वास होता. मार्क्सने क्रांतीची गरज स्पष्ट केली होती परंतु यासाठी हिंसेचा किंवा अहिंसेचा मार्ग स्वीकारावा हे स्पष्ट केले नाही. त्यांच्या याच क्रांतीचा विचारावर ब्लादिमीर लेनिन, स्टॅलिन आणि माओ झेडाँगने आपल्या आपल्या देशात क्रांती घडवून आणली. लेनिन स्पेलिंग आणि माओच्या मते रक्त सांडल्याशिवाय क्रांती यशस्वी होऊ शकत नाही. याच रक्तरंजित क्रांतीच्या जोरावर माओ झेडाँगने चीनमध्ये साम्यवाद प्रस्थापित केला. चीनमधील साम्यवादाला अभूतपूर्व यश मिळालेले पाहून क्युबा, वियतनाम, लाओस आणि उत्तर कोरिया या ठिकाणी साम्यवादी राज्यव्यवस्था स्वीकारण्यात आली. भारतात सुद्धा डाव्या विचारसरणीचे 'भारतीय कम्यूनिस्ट पक्ष' आणि 'मार्क्सवादी भारतीय कम्यूनिस्ट पक्ष' असे दोन कम्यूनिस्ट पक्ष कार्यरत आहेत. यांचा जास्त प्रभाव पश्चिम बंगाल त्रिपुरा आणि केरळ या ठिकाणी दिसून येतो. या कम्युनिस्ट विचारांवरच माओवादाचीच म्हणजेच नक्षलवादाची चळवळ सुरू झालेले दिसून येते.

भारतातील माओवादाची 'नक्षलवादाची' सुरुवात

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी भारतात मोठ्या प्रमाणात जंगले अस्तित्वात होते. भारताला भौगोलिक नैसर्गिक साधन संपत्ती विपुल प्रमाणात प्राप्त आहे. सोन्याच्या, हिऱ्याच्या, किंमती धातूंच्या खाणी अहोरात्र चालू आहेत. परकीय आणि हळूहळू भारतीय साधन संपत्ती लूटून नेली. भारतीय खेडी पूर्वी आत्मनिर्भर आणि परस्परपूरक होती ती सर्व बंद पडली. अठराव्या शतकानंतर इंग्रजांनी भारतातील सर्व उद्योग बंद पाडून तो कच्चा माल युरोपमध्ये नेऊन परत भारतीय बाजारपेठेत उच्च किमतीने विकू लागले. भारतातील राजे, महाराजे, सरदार, जमीनदार, सरंजामदार यांचे वर्चस्व कालानुसार वाढतच गेले. नंतर नंतर भांडवलदारांचे वर्चस्व मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाले. या भांडवलदारांकडून जंगले, खाणी ताब्यात घेतल्या जाऊ लागल्या. आजही भारतात अनेक ठिकाणी भांडवलदारांचे वर्चस्व दिसून येते. या जंगलामध्ये खाली भागात गावामध्ये गरीब

जनता, आदिवासी, शेतकरी राहत आहेत. त्यांच्यावर कालानुरूप सर्व परकीयांसोबत या सर्व राजे, महाराजे, सरंजामदार, जमीनदार आणि भांडवलदार यांनी अनेक अत्याचार केले. या अत्याचाराला कंटाळूनच या जनतेने सशस्त्र चळवळ सुरू केली.

**नक्षलवादाचा उगम आणि कारणे**

भारतातील गरीब आदिवासी शेतकरी लोकांनी जे सशस्त्र चळवळ सुरू केली ती मार्क्सवादाच्या साम्यवादावर तसेच माओच्या रक्तरंजित क्रांतीचा विचारावर आधारलेली होती. १९६७ मध्ये चारू मुजुमदार, कान्हू सान्याल, जंगल संथाल इ. साम्यवादी विचारसरणीच्या नेत्यांनी पश्चिम बंगालमध्ये दार्जिलिंग जिल्ह्यात 'नक्षलबारी' या गावात भांडवलदारांनी जमीनदार यांच्या विरोधात शेतकऱ्यांसाठी उठाव केला. या उठावाचे पुढे आंदोलनात रूपांतर झाले म्हणून या चळवळीला नक्षलवाद असे म्हटले गेले.

कोणत्याही चळवळीचा मुख्य आधार हा समाजातील वंचित घटकावर झालेला अन्याय असतो त्याचप्रमाणे नक्षलवादाची चळवळ संपूर्ण भारतभर पसरण्याची काही प्रमुख कारणे पुढील प्रकारे सांगता येतील.

अ) सामाजिक कारणे-

१) भारतात मोठ्या प्रमाणात जातींचा संघर्ष आहे. प्रचलित भारतीय जात व्यवस्थेमुळे अनुसूचित जाती जमाती यांना उपेक्षित ठेवले गेले.

२) भारतातील जंगलाचे प्रमाण जास्त असून त्या ठिकाणी राहणारे आदिवासी लोक यांना विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचीत ठेवले गेले.

३) गडचिरोली, चंद्रपूर, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा या ठिकाणी आदिवासी समाजाला आरोग्य शिक्षण यासारख्या मूलभूत सुविधा सुद्धा प्राप्त झालेल्या नाहीत.

४) बस्तर, दांतेवाडा इ. सारख्या ठिकाणी आदिवासींना विस्थापित करण्यात आले. त्यांना त्यांच्या चालीरीतीनुसार संस्कृतीनुसार पारंपारिक जंगलावर हक्क मिळाले नाहीत.

ब) आर्थिक कारणे-

१) दुर्गम भागातील वास्तव्यामुळे दळणवळणाचा अभावामुळे झारखंड ओडिशा छत्तीसगड गडचिरोली इत्यादी ठिकाणी रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध आहेत.

२) 'नॅशनल सँपल सर्वे ऑफिस'(NSSO) च्या गणना अहवालानुसार या ठिकाणी 30 टक्क्याहून अधिक लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. अशा परिस्थितीत जनता चळवळीकडे आकर्षित होणे सहज शक्य आहे.

३) भारतात अजूनही जमीन सुधारणा कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली नाही. अजूनसुद्धा 'कसेल त्याची जमीन' हे मागे पडून समाजातील उच्च लोकांचे जमिनीवरील वर्चस्व वाढलेले आहे.

४) भारतात पूर्वी प्रक्रिया सोबत सरांचा आमदार यांचे वर्चस्व होते नंतर जमीनदार आणि भांडवलदार यांचा वर्ग निर्माण होऊन शेतकरी आणि कामगार यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत आहे. यामुळेच पश्चिम बंगाल, गडचिरोली यासारख्या ठिकाणी चळवळीचा प्रभाव जास्त दिसून येतो.

क) राजकीय कारणे-

१) भारतातील नक्षलवाद प्रभावित भाग हा भौगोलिकदृष्ट्या दुर्गम आहे. तिथपर्यंत दळणवळणाचे फारसे व्यवस्था अस्तित्वात नाही यामुळे या ठिकाणी शासकीय योजना पोहोचवल्या जात नाहीत.

२) भारतीय नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (CAG) यांच्या अहवालानुसार आदिवासी कल्याण योजनेतून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला गेला आहे.

३) स्थानिक प्रशासकीय अधिकारी आणि स्थानिक नेते यांची विकास कामाच्या बाबतीत उदासीनता आढळून येते.

४) भारतातील काही भागांमध्ये सामान्य जनतेस विश्वासात न घेता प्रशासनाने दडपशाहीचा अवलंब केला. मोठ्या प्रमाणात सैन्याचा वापर केला गेला. त्यामुळे वंचित जनतेत जास्त प्रमाणात असंतोष निर्माण झाला.

५) 'सलवा जुडूम' कार्यक्रम आणि 'सामाजिक सुरक्षा बटालियन' सारख्या योजना ज्या पद्धतीने राबवण्यास हव्या होता त्या पद्धतीने राबवल्या गेल्या नाहीत. उलट या प्रयोगामुळे नक्षलवादास प्रोत्साहन मिळत गेले. या प्रयोगावर मानवाधिकार आयोग आणि सुप्रीम कोर्टाने बेकायदेशीर ठरवून हे प्रयोग बंद करण्यास सांगितले.

ड) आंतरराष्ट्रीय घटक-

काही अहवाल आणि राजकीय अभ्यासकांच्या मते सीमाभागात काही आंतरराष्ट्रीय गट उदा. नेपाळमधील माओवादी संबंधीत गट म्यानमार मधील काही बंडखोर गट यांच्याकडून नक्षलवादी चळवळीला शस्त्रास्त्रे आणि प्रशिक्षण पुरवण्यात येते.

**'रेड कॉरिडॉर' चा प्रभाव:-**

भारतातील ज्या भागात नक्षलवाद पसरलेला आहे त्यास रेड कॉरिडॉर असे संबोधण्यात येते. पूर्वेकडील राज्य मध्य भारतातील जंगल प्रदेश आदिवासी भाग यांचा रेड कॉरिडॉर मध्ये समावेश होतो. केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, बिहार आणि पश्चिम बंगाल ही राज्य प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात नक्षलवादांच्या प्रभावाखाली आहेत. मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगाणा व कर्नाटक या राज्याचा काही भाग नक्षलवादी ग्रस्त म्हणून ओळखला जातो. तर उत्तर प्रदेश केरळ तामिळनाडू या ठिकाणी नक्षलवादांचा कमी प्रभाव दिसून येतो. छत्तीसगडमधील बस्तर दांतेवाडा या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात नक्षलवादी सक्रिय आहेत. तर झारखंड मधील सराईकेला, लोहरदगा, बिहारमधील गया आणि औरंगाबाद हे ठिकाणी सुद्धा नक्षलग्रस्त म्हणून ओळखली जातात.

नक्षलवादी चळवळ ही हिंसात्मक क्रांतीवर आधारलेली असल्यामुळे भारतात नक्षलवाद्यांकडून झालेल्या हल्ल्यात सामान्य नागरिकसुद्धा मारले जातात. या हिंसाचाराच्या भीतीने नागरिकांना विस्थापित व्हावे लागते. नक्षलवादी हल्ल्यामुळे पायाभूत सुविधा विकास योजना प्रकल्प खुंटले जातात, त्यांच्यावर मर्यादा येतात. या हल्ल्यात जर शाळा, दवाखाने सापडली तर सामान्य जनतेला मूलभूत सेवा मिळण्यास अडचणी येतात. रक्तपाती हल्ल्यात जवानांचा, पोलिसांचा मृत्यू यामुळे जनतेत भीती पसरते. अलीकडील दशकात अनेक सुरक्षा दलाचे जवान, शेकडो पोलीस, निमलष्करी दलाचे जवान यासोबत सामान्य नागरिकसुद्धा नक्षलवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडले आहेत. एप्रिल २०१० च्या दंतेवाडा हल्ल्यामध्ये केंद्र राखीव पोलीस दलातील ७६ जवानांचा मृत्यू झालेला होता.

**नक्षलवादावरील उपाय:-**

नक्षलवाद ही एक विचारसरणी आहे ज्याचे उत्तर भारतीय लोकशाहीच्या कल्याणकारी राज्याच्या तत्त्वांमध्ये लपलेले आहे. नक्षलवाद नष्ट करण्यासाठी भारतातील तळागाळातील जनतेपर्यंत लोकशाहीची तत्वे पोहोचवणे गरजेचे आहे. नक्षलवाद नष्ट करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाय करता येतील

क) सुरक्षा उपाय-

१) CRPF, COBRA, BSF, पोलीस दल यांना अत्याधुनिक शस्त्रसज्ज करणे, प्रशिक्षण देणे.

२) ड्रोन्स, सॅटेलाइट, रडार इ. तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.

३) 'ऑपरेशन ग्रीन हंट' 'समाधान योजना' यासारखे कार्यक्रम वाढवणे.

४) अत्यंत प्रभावी क्षेत्रात एकत्रित सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करणे.

५) ग्राम सुरक्षा समित्या स्थापन करणे.

६) आदिवासी तरुणांना 'स्पेशल पोलीस ऑफिसर' (SPO) सारखा रोजगार पुरवणे.

ख) सामाजिक उपाय-

१) वन हक्क कायद्याची सर्व क्षेत्रात अंमलबजावणी करणे.

२) आदिवासी, मूळ निवासी यांना जमिनीचे हक्क पुरवणे. रोजगार देणे.

३) शरणागतांसाठी पुनर्वसन कार्यक्रम राबवणे.

४) चळवळ सोडून मुख्य प्रवाहात येण्यासंबंधी आवाहन करणे, त्याविषयी जनजागृती करणे, समुपदेशन आणि समन्वयाचे धोरण आखणे.

ग) आर्थिक उपाय-

१) रेड कॉरिडॉर मध्ये दळणवळणाच्या सुविधा निर्माण करणे.

२) पायाभूत सुविधा जसे शाळा, आरोग्य केंद्रे, तांत्रिक शिक्षण स्थापन करणे.

३) मनरेगा सारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून रोजगार पुरवणे.

४) जंगली वनस्पतींची माहिती घेऊन बांबू, तेंदू, औषधी वनस्पती, इ. नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारीत स्थानिक पातळीवर व्यवसाय सुरू करणे.

घ) राजकीय आणि प्रशासकीय उपाय-

१) नक्षलग्रस्त भागातील जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांना लोकशाहीचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे यासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे आहे.

२) स्थानिक पातळीवरील प्रशासन, नेतृत्व आणि स्थानिक जनता यांचे आपापसातील सहकार्य वाढवावयास हवे एकमेकांवरील विश्वास वाढविला पाहिजे.

३) भ्रष्टाचार ऐवजी स्वच्छ गतिमान प्रशासन आणि विकास योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

४) ग्रामपंचायत स्थानिक जनतेला अधिक अधिकार देणे.

५) स्थानिक जनतेला सरकारकडून पुरवल्या जाणाऱ्या योजनांची अधिकारांची माहिती पुरवणे यासाठी समाज माध्यमे रेडिओ यांचा वापर करणे.

६) नक्षलवादांनी केलेल्या अत्याचारांविषयी जनतेत जागृती करणे.

७) एकल विद्यालय योजना सर्व शिक्षा अभियानाचे प्रभावीपणे अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे.

८) रेड कॉरिडॉर भागातील युवा पिढीसाठी कौशल्य विकास केंद्र, शिक्षण, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम इ. सुरू करणे.

'लेखा मेंढा गाव' योजना:-

भारत सरकारने या उपाययोजनांचा अवलंब करून नक्षलवादाचे प्रमाण ४०कमी केले आहे %. 'लेखा मेंढा गाव योजना' हे नक्षलवादावरील फार मोठे उत्तर आहे. १९९०च्या दशकात लेखा मेंढाच्या स्थानिक गावकरी लोकांनी ही योजना स्वतःसाठी तयार केली. यामध्ये त्यांनी सामूहिक निर्णय प्रक्रिया सुरू केली. अठराशे हेक्टर जंगलाचा हक्क त्यांना २००९ मध्ये मिळाला. गावाच्या परवानगीने इथे सर्व अधिकाऱ्यांना गावात जाता येते. गावकऱ्यांना वनौपज विक्रीचा थेट अधिकार मिळाला. ग्रामसभेने स्वतः जंगल व्यवस्थापन ताब्यात घेतलेले आहे. त्यातून कोटीहून अधिक नफा मिळवला. याचा वापर त्यांनी आरोग्य शिक्षणासाठी तसेच इतर विकास प्रकल्पासाठी वापरला. लेखामेंढा गावाने सामाजिक, सर्वांगीण विकासावर भर देत गावात दारूबंदी लागू केली. गावाने विकासावर भर दिल्याने शंभर टक्के साक्षरता आहे. स्थानिक रहिवाशांनी परंपरा, पर्यावरण पूरक विकासावर भर दिलेला आहे.

**निष्कर्ष:-**

भारतीय समाज व्यवस्थेवर नक्षलवादाचे गंभीर आव्हान आहे. हा प्रश्न फक्त सामाजिक, आर्थिक, सुरक्षा या पुरता मर्यादित नसून सामाजिक असमानता आदिवासींचे हक्क विकासाचा अभाव इत्यादी सर्व गोष्टी एकमेकांसोबत जोडलेल्या आहेत. नक्षलवादांसाठी बंदुकीची गोळी पुरेशी नाही तर संपूर्ण तळागळातील जनतेचा लोकशाहीवरील विश्वास संपादन करून विकास करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची:-**


१) The Hindu
२) Times of India
३) दै. लोकसत्ता
४) दै. सकाळ
५) दै. लोकमत
६) भारतीय सामाजिक समस्या - प्रा. ए. वाय. कोंडेकर.
७) भारतातील सामाजिक चळवळी- प्रा. डॉ. विजय मारुलकर,प्रा. डॉ. दयावती पाडळकर.
८) 'बस्तर: द नक्षल स्टोरी'- निर्माते सुदीप्तो सेन